दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | शनिवार, 18 जुलै 2026 | अंक क्र. 73 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com






## ना.पंकजाताई मुंडेंनी दिलेल्या शब्दाप्रमाणे मदतीचा चेक घेऊन मयत विलास घुलेच्या पत्नी व कुटुंबियांची घेतली सांत्वनपर भेट

### न्यायासाठी शेवटपर्यंत सोबत राहण्याची दिली ग्वाही

■ केज प्रतिनिधी

तालुक्यातील टाकळी गावचा युवक स्व. विलास घुलेच्या पत्नी व कुटुंबियांची राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज सांत्वनपर भेट घेऊन धीर दिला. दिलेल्या शब्दाप्रमाणे त्यांनी गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने पाच लाखाचा मदतीचा धनादेश घुलेच्या पत्नीकडे सुपूर्द केला. न्यायासाठी शेवटपर्यंत सोबत राहण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

मागील महिन्यात टाकळी-कदमवाडी (ता. केज) परिसरात झालेल्या एका घटनेत विलास घुले या युवकाचा हकनाक बळी गेला होता, त्याच्या दुर्दैवी मृत्यूमुळे घुले परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. घुले परिवाराच्या दुःखात आणि न्यायाच्या लढाईत पाठिशी असल्याचे सांगत ना. पंकजाताई मुंडे यांनी त्याच्या परिवाराचे पालकत्व स्वीकारत गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान च्या वतीने पाच लाखाची मदत जाहीर केली होती. आज संध्याकाळी बीड कडे जाताना त्यांनी टाकळीत जाऊन घुले परिवाराची सांत्वनपर भेट घेतली आणि मदतीचा चेकही दिला. न्यायासाठी शेवटपर्यंत सोबत राहण्याची ग्वाही त्यांनी घुले कुटुंबास दिली.

## छत्रपती संभाजी महाराज चौक ते लोकनेते गोपीनाथराव मुंडे चौक मार्गावर पथदिवे बसविण्याची युवा नेते बालाजी चाटे यांची मागणी



■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

परळी शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक ते बीड मार्गावरील लोकनेते गोपीनाथराव मुंडे चौकापर्यंतच्या रस्त्यावर पुरेशा पथदिव्यांची व्यवस्था नसल्यामुळे पायी प्रवास करणारे नागरिक, भाविक आणि वारकरी यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या मार्गावर तातडीने नवीन पथदिवे अथवा कोनिकल पोल परळी वैजनाथ नगर परिषद प्रशासनाने बसविण्यात यावेत अशी मागणी युवा नेते बालाजी चाटे यांनी केली आहे.

परळी वैजनाथ नगरी ही बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री प्रभू वैद्यनाथ मंदिराची नगरी असल्याने वर्षभर भाविकांची मोठी वर्दळ असते. विशेषतः आषाढी वारीच्या व श्रवण महिना काळात विविध पालख्या, दिंड्या व कावड यात्रा आणि हजारो वारकरी या मार्गाने ये-जा करतात. मात्र रात्रीच्या वेळी पुरेशा प्रकाशाअभावी नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि भाविकांना गैरसोयीचा सामना करावा लागत असून अपघाताचीही शक्यता निर्माण होत आहे.

बालाजी चाटे यांनी सांगितले की,



शहराच्या प्रमुख मार्गांवर प्रकाश व्यवस्था सक्षम असणे ही नगर परिषदेची जबाबदारी आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या मार्गावर तातडीने नवीन एलईडी पथदिवे किंवा कोनिकल पोल उभारून कायमस्वरूपी प्रकाश व्यवस्था करण्यात यावी. याबाबत नगर परिषद प्रशासनाने तातडीने नवीन एलईडी पथदिवे किंवा कोनिकल पोल बसवावेत अशी मागणी युवा नेते बालाजी चाटे यांच्यासह परिसरातील नागरिक व भाविकांनीही व्यक्त केली आहे.

## सोनम वांगचुक यांना पाठिंबा देण्यासाठी परळीत तीव्र निदर्शने संपन्न




### धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा न दिल्यास 20 रोजी विद्यार्थ्यांसह तहसिलवर मोर्चा

■ परळी प्रतिनिधी

गेल्या 18 दिवसापासून दिल्लीतील जंतर-मंतरवर देशातील हजारो विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर उपोषणाला बसलेल्या जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ , शिक्षणप्रेमी व पर्यावरण तज्ञ सोनम वांगचूक यांना पाठिंबा देण्यासाठी परळीतील शिक्षणप्रेमी ,व सर्वपक्षीय नागरिकांच्या वतीने परळीत तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली तसेच 20 जुलैपर्यंत सरकारने दखल घेतली नाही तर परळीत विद्यार्थ्यांसह नागरिकांच्या वतीने भव्य मोर्चा तहसील कार्यालयावर काढण्यात येणार आहे.

देशातील शिक्षण व्यवस्थेतील सुधारणासाठी दिनांक 17 जुलै रोजी परळीतील शिक्षण प्रेमी व तमाम नागरिकांच्या वतीने सकाळी 11 वाजता राणी लक्ष्मीबाई टॉवर येथे तीव्र निदर्शने करण्यात आली.नीट, टीईटी आदी परीक्षांचे होणारे पेपर लिक होत असल्यामुळे करोडो विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त होत आहे .शिक्षण व्यवस्थेतील या गैरकारभाराची जबाबदारी घेऊन शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी गेल्या 18 दिवसापासून दिल्लीतील जंतर-मंतरवर कॉक्रो जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांचे आंदोलन चालू आहे. या आंदोलनात विद्यार्थ्यांना पाठिंबा देण्यासाठी जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि शिक्षणप्रेमी व पर्यावरण तज्ञ सोनम वांगचुक उपोषणाला बसले आहेत. त्यांची तब्येत दिवसेंदिवस खालावत आहे. तरीही सरकारला जाग येत नाही.

केंद्र सरकारच्या निषेधार्थ व सोनम वांगचूक यांना पाठिंबा देण्यासाठी आज परळीकरांनी निदर्शने केली यावेळी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली असेच उपोषणाचे दखल न घेणाऱ्या व लोकशाहीची पायमल्ली करणारे केंद्र सरकारचा धिक्कार करण्यात आला येत्या 20 तारखेपर्यंत अभिजीत तितके आणि विद्यार्थ्यांचे आंदोलन लक्षात घेऊन केंद्र प्रधान यांचा राजीनामा झाला नाही तर परळी शहरातील शालेय महाविद्यालय विद्यार्थी शिक्षण प्रेमी शहरातील सर्वपक्षीय विविध संघटना सामाजिक कार्यकर्ते यांच्या वतीने राणी लक्ष्मीबाई टॉवर इथून तहसील कार्यालयावर सकाळी 11 वाजता भव्य मोर्चा काढण्याचे यावेळी सर्वानुमते ठरले. या आंदोलनात माकापाचे जिल्हा महासचिव एडवोकेट अजय बुरांडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष महादेव गंगणे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष एडवोकेट प्रकाश मुंडे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, काँग्रेसचे शहराध्यक्ष शिवाजीराव देशमुख , मनसेचे तालुकाप्रमुख श्रीकांत पाथरकर ,जिल्हा उपाध्यक्ष दत्ता दहिवाळ,माजी शहराध्यक्ष बहादूर भाई, प्रा. दासू वाघमारे , सामाजिक कार्यकर्ते विश्वनाथ गायकवाड,शेजुळ,प्रा. विलास रोडे, माजी नगरसेवक रवी मुळे, माकपचे शहराध्यक्ष किरण सावजी,सामाजिक कार्यकर्ते चेतन सौंदळे, पांडुरंग राठोड, विठ्ठलराव झिलमेवाड, सामाजिक कार्यकर्ते नवनाथ दाने,केशव मुंडे, पत्रकार रानबा गायकवाड, पत्रकार भगवान साकसमुद्रे, पत्रकार प्रकाश चव्हाण, प्रशांत कामाळे, बारगजे ,चंद्रमणी वाघमारे यांच्यासह शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री वैद्यनाथ आयटीआय कॉलेज हाळमचे परळी येथील संपर्क कार्यालयाचे उद्घाटन संपन्न



■ (परळी-प्रतिनिधी)

परळी तालुक्यातील हाळम येथे कार्यरत असलेल्या श्री वैद्यनाथ आयटीआय कॉलेजचे परळी वैजनाथ येथील संपर्क कार्यालयाचे उद्घाटन संपन्न झाले.

याबाबत सविस्तर माहिती अशी की दयाधर्म सामाजिक प्रतिष्ठान संचलित श्री वैद्यनाथ आयटीआय कॉलेज हाळम, व केजी स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष माधवराव मुंडे यांचे आई- वडील सौ.कुशाबाई मंचकराव मुंडे यांच्या हस्ते फीत कापून व विधिवत पूजा करून संपन्न झाले. हे कार्यालय शिवाजी चौकात तील नाथ रोडवर घुगे कॉम्प्लेक्स येथे अस्तित्वात असून या कार्यालयाच्या माध्यमातून आयटीआय व जुनियर कॉलेज ला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी व पालकाना संपर्क करण्याची सोय संस्थेमार्फत उपलब्ध करून दिली आहे अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष युवा नेते माधवराव मुंडे यांनी दिली आहे. यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## आ. सुरेश अण्णा धस यांच्यावरील आरोपांवर समर्थक आक्रमक; सोशल मीडियावरील व्हिडिओ व्हायरल

■ आष्टी ( प्रतिनिधी )

आ. सुरेश धस यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या समर्थकांनी आक्रमक भूमिका घेतली असून, यासंदर्भातील काही व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.



व्हिडिओमध्ये आ.सुरेश धस यांच्यावरील आरोप पूर्णपणे बिनबुडाचे, निराधार आणि केवळ राजकीय प्रसिद्धीसाठी करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. आ. धस हे सर्वसामान्यांचे आधारवड व दीन-दुबळ्यांचे कैवारी असून त्यांनी नेहमीच जनतेच्या प्रश्नांसाठी संघर्ष केला आहे. अशा नेतृत्वावर खोटे आरोप करून प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न यशस्वी होणार नसल्याचे समर्थकांनी म्हटले आहे.

व्हिडिओमध्ये जयंत पाटील यांच्यावरही टीका करण्यात आली असून, दुसऱ्यांवर आरोप करण्यापूर्वी स्वतःच्या भूतकाळाचे आत्मपरीक्षण करावे, तसेच जनतेच्या प्रश्नांवर बोलावे, असा इशारा देण्यात आला आहे. "स्वतःचे ठेवायचे झाकून आणि दुसऱ्याचे पाहायचे वाकून" अशा शब्दांतही टीका करण्यात आली आहे. याशिवाय, आ. सुरेश धस यांच्याविरोधात यापुढेही बिनबुडाचे आरोप करण्यात आल्यास समर्थक लोकशाही मार्गाने परंतु आक्रमकपणे जशास तसे प्रत्युत्तर देतील, असा इशाराही या व्हिडिओतून देण्यात आला आहे. दरम्यान, संबंधित व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असून त्यावर विविध स्तरांतून प्रतिक्रिया उमटत आहेत.




## कातरवेळ

असेल काळाहाती मरणे, परि आमुच्या हाती जगणे. काळा एवढा उत्तम शिक्षक विरळचं असावा. सामान्यतः आयुष्यात खुणा पेरत आलेली सांजवेळ अटळ आणि अढळ असल्याने तिला न नाकारता झेलत स्वीकारणाचा पर्याय उत्तमचं मानावा लागेल. अर्थात परमेश्वर एकावेळी एकच सण देतो, तर दुसरा देण्यापूर्वी पहिला सण काढून घेतो असंच काहीसं कातर वेळेबाबत आहे. दिवसभर इथं तिथं नाचणाऱ्या, भुकेलेल्या, तहानलेल्या श्रमिकांच्या सावल्या सांजेच्या अंधारात गुडूप होतात, अंतर्मनात शोक निर्माण होतो, चर्र अशी उरातली धडधड, काळोख्या रात्रीला स्वच्छंदी स्वप्नांना आपल्या कुशीत घेऊन, कुणासाठी न थांबणारी तिन्हीसांज परतायला आतूर असते. पहाटेच्या प्रहरी आभाळ भरून येतं स्वप्नांनी. या स्वप्निल वाटेवर धावणं सोपं नसलं तरी हिंमत करून महत्त्वाकांक्षा उंची गाठते. इच्छापूर्तीचा व्यासंग निर्विघ्नपणे पार पडतो. पावलांना जोर चढतो. मी कोण? तू कोण? यात न पडता सिद्धी पूर्ततेसाठी जो तो झटतो अन् कामाच्या व्यापात झोकून देतो स्वत:ला. पोटासाठी कामाचं व्यसनचं जडतं. वेळेनुसार कामाची गणितं पाळली जातात. श्रमाला विश्रांतीची गरज असल्याने सायंकाळी घर खुणावू लागतं. प्रपंचाचे दरवाजे बोलावू लागतात, कुटुंबाचं सुख डोळ्यांसमोर तरळू लागतं. कामाच्या व्यतिरिक्त कक्षेबाहेर केलेला विचार सांजवेळी मनात येतो. मनुष्यगण पशूपक्ष्यांच्या परतीच्या वेळा नियमित असल्याने आसमंतास वेळेची चाहूल लागते आणि शांत शांत पावलांनी कावऱ्या बावऱ्या उदासवाण्या चित्ताने चालत येते कातरवेळ!

क्षितीजावर केंद्रित झालेले धुंद मन अंतर्मनात आठवणी घेऊन व्याकुळ होते. काही स्वप्न पूर्णत्वास जातात, आनंद देतात, तर काही मनोदशेतल्या मैलांचे अंतर कापत अदृश्य सीमारेषेला स्पर्श करतात. वेळ सरल्याची ही ओढ कुठून येते? रम्य पहाटेला खुणावणारी सांजवेळ का थरथरते? काय मागणं असतं तिचं? हृदयाजवळचा निनावी शोध सुटत नाही. बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्ग सोडू नको, यातायात संपत नाही. तिथं पोहोचेस्तोवर कुणाचे पडसाद नसतात, ना कुणाचा मागमूस ना सीमेवर पोहोचण्याचं समाधान असतं. मोकळं रान, डांबरी रस्ते, सुसाट वळती घराकडे, कातरवेळी मन हुरहुरते वेग घेई वाटेकडे. वाईट साईट विचारी इंगळ्यांचे डसणारे वेदनादायी सूर लागता, घायाळ अवस्थेतील जेरबंद व्याकुळल्या मनाला आवरण्याची आणि आवरलेल्या भाव भावनांना सावरण्याची साधून आलेली वेळ कातरवेळ होऊ पाहते. नि:शब्द जड पावलांनी संध्या येऊ लागता, सांजदिशा मंदगतीने अंधारू लागतात. पलीकडे क्षितीजावरच्या साध्या बहुसंख्य रेषा मावळत्या रंगांनी भरून आलेल्या असताना त्याकडे पाहताच गलबलून उठतं, वातावरणात भरलेली जगावेगळी ओढ नकळत खेचत राहते. आभाळातून कुणीतरी आर्त साद घालावी आणि त्या हृदयस्पर्शी हाकेला आपण प्रतिसाद द्यावा पण तो तिथपर्यंत पोहोचू नये अशी केविलवाणी अवस्था होते. त्या वेळची मनातली कालवाकालव अन् जीवाची घालमेल म्हणजे कातरवेळ असते.

प्रकाशाकडून अंधाराच्या वाटेवर एका दृष्टिक्षेपात मावणारं निसर्गाचं अद्भुत सौंदर्य, रंगबिरंगी रानफुलं, वाऱ्याच्या झोतावर मुरडणारी नाजूक लवलवती पाती, डेरेदार वृक्षावर संसार थाटलेली पाखरं, शहरात, वस्त्यांवर, आडमुठ्या वळणाशी दोन पायांवर चालणारी आया बाया, मुलं, माणसं धूसर होतात. केवळ अस्तित्वाचे भास मानत राहायचे. समयी घटिकेचे अंधाराला एकचं मागणे असते की, हे मळभ दूर सार आणि प्रकाशास अधिक तेजोमय कर. पूर्ण दिवसात तसूभरही बदल झाला नसल्याने निरागस झाडं, पानं, फुलं उदास वाटतात. सारा आसमंत निपचित पडल्यासारखा भासतो. माणसांचे थवेच्या थवे रस्त्यावर आक्रमण करतात. पांथस्थ होतात. निर्मितीला रंगाचे धुमारे फुटत नाहीत. फुलांचा रंगगंधाचा मोह सरतो. सुगंधी दरवळ वाऱ्याला मोहवत नाही, सारं असूनही मन कशात रमत नाही. बोलघेवड्या अबोलतेला कवच फोडता येत नसल्याने आठवणींनी मन गाभारा भरून येतो. अधूरेपणाची सल कातरत जाते. दारामागचा आक्रोश ऐकू न आल्याने, मनाची कवाडं मिटली जातात अन् परतीच्या प्रवासात सोबत करणारी कुणाची तरी आठवण बैचेन करते. डोळ्यांदेखत विरत जाणारी कृष्णधवल रंगीत दिवास्वप्नांची लकेर तरंग उठवत नाही. मन सैरभैर करणारी कातरवेळचं असते. अस्तित्वाचे सारे रंग होती गगनात दंग, हा कातरवेळचा खेळ चाले मनात जनात. कुणीतरी म्हटलेल आहेच की, आतल्या आत शब्दाचा भार आसवांचा पाऊस, झाकोळलेल्या आशा अपेक्षा सारं काही नि:शब्द, निपचित तरी कवाडावरची थाप तसंच बंद दारावरची टकटक ऐकण्यासाठी मनाच्या सांदी कोपऱ्यात अधिक आतूर अधिरलेली संवेदना वाट पाहत असते. ही टकटक नुसत्या आवाजावरून ओळखता येते. प्रतीक्षेची पूर्तता होणं अथवा न होणं ही त्या टकटकीची चाहूल सांगते. आज जानेकी जीद ना करो म्हणणारी सांज कातरवेळ मनपूर्तीचं समाधान देताना कधी खुलते, तर कधी प्रतीक्षेची नुसती हुरहूर लावून जाते. खत्म नहीं होती कुछ बातें कुछ मुलाकाते. खत्म नहीं होते कुछ अच्छे पल, कुछ खुशिया. खत्म नहीं होती कुछ गलिया कुछ शाम के अंधियारे पल... खत्म नहीं होते... खत्म नहीं होते...!



# वाहिरा येथून संत शिरोमणी शेख महंमद बाबा वारकरी दिंडी सोहळा पंढरपूरकडे मार्गस्थ; वृक्षारोपणाने झाला शुभारंभ

■ प्रतिनिधी- सोपान पगारे

**आषाढी वारीच्या पवित्र निमित्ताने श्री संत शिरोमणी शेख महंमद बाबा वारकरी दिंडी सोहळा, क्षेत्र वाहिरा येथून आज पंढरपूरकडे मार्गस्थ झाला. पालखी प्रस्थानापूर्वी संत शिरोमणी शेख महंमद महाराज समाधी परिसरात वृक्षारोपण करून या सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला. भक्तीसमवेत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वारकरी आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत वृक्ष लावले.**





# प्रविण बापूराव मांजरे यांना कृषी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान

■ सिरसाळा (अतुल बडे)

प्रविण बापूराव मांजरे यांनी "आंबा (केसर) वाणामध्ये विविध सूक्ष्मजीव संमिश्रांच्या (Microbial Consortia) वापराचा उत्पादनक्षमता व फळांच्या गुणवत्तेवरील परिणामाचा अभ्यास" या विषयावरील संशोधन प्रबंध यशस्वीरित्या सादर करून कृषी विद्याशाखेतील उद्यानविद्या (फळशास्त्र) विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी संपादन केली.

सदर संशोधनकार्य फळ संशोधन केंद्र, हिमायत बाग, छत्रपती संभाजीनगर येथे मार्गदर्शक डॉ. एम. बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले. या संशोधनामध्ये आंबा (केसर) वाणामध्ये विविध सूक्ष्मजीव संमिश्रांचा वापर केल्याने उत्पादनक्षमता वाढण्यास तसेच फळांची गुणवत्ता सुधारण्यास होणाऱ्या परिणामांचा सखोल अभ्यास करण्यात आला. या सूक्ष्मजीवामध्ये ॲझोटोबॅक्टर, स्फूरद विरघळणारे जिवाणू, पालाश विरघळणारे जिवाणू, गंधक विरघळणारे जिवाणू, जस्त विरघळणारे जिवाणू इ. चा वापर केला गेला. दोन वर्षाच्या संशोधनातून मिळालेले परिणाम प्रबंधमध्ये सादर करण्यात आले. यातून नक्कीच शेतकऱ्याचा रासायनिक खतावरील खर्च कमी होऊन उत्पादनात भर पडेल. हे संशोधन आंबा उत्पादक शेतकऱ्यांसाठी तसेच शाश्वत आणि पर्यावरणपूरक फळबाग व्यवस्थापनासाठी उपयुक्त ठरणारे आहे. विविध सूक्ष्मजीव समिश्र वापरातून आंबा साठवणुकीचा कालावधी सुद्धा वाढल्याचे निष्कर्ष आले आहेत.

या प्रबंधाची अंतिम मौखिक परीक्षा (Viva-Voce) डॉ. रणजित धेवारे (अधिकारी, आंबा संशोधन केंद्र, वेंगुर्ला, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी) यांनी बहिस्थ परीक्षक म्हणून घेतली. यावेळी उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. विश्वनाथ खंदारे यांच्यासह मार्गदर्शक डॉ. एम. बी पाटील, संशोधन सल्लागार समितीचे सदस्य डॉ. जि. एम. वाघमारे, डॉ. एस. जे. शिंदे, डॉ. सय्यद इस्माईल, डॉ. एस. एस. मोरे, डॉ. ए. एम. भोसले, डॉ. बी. एम. कलालबंडी तसेच विभागातील इतर प्राध्यापक उपस्थित होते. प्रविण मांजरे यांनी यापूर्वी राष्ट्रीय पात्रता परीक्षा (NET) दोन वेळा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली असून त्यांनी विविध कृषी महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक म्हणून कार्य केले आहे. सध्या ते ग्लोबल विकास ट्रस्ट या नामांकित संस्थेत कृषीतज्ञ् म्हणून कार्यरत असून शेतकऱ्यांना आधुनिक, शाश्वत आणि तंत्रज्ञानाधारित शेतीविषयक प्रशिक्षण, मार्गदर्शन तसेच कृषी विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहेत.

आदरणीय मयंक गांधी आणि ग्लोबल विकास ट्रस्टच्या इतर सदस्यांनी या यशाबद्दल अभिनंदन करून शेतकऱ्यांची सेवा करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल मार्गदर्शक, प्राध्यापक, सहकारी, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील संशोधन व सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



# गुजरातचे प्रसिद्ध उद्योगपती मोहन घुगे यांना प्रथम 'राष्ट्रीय संत भगवान बाबा जीवन गौरव पुरस्कार' जाहीर

### ९ ऑगस्ट रोजी भव्य सोहळ्यात होणार वितरण; विविध क्षेत्रातील दिग्गजांना 'समाजरत्न' पुरस्काराने गौरवणार

■ आष्टी प्रतिनिधी :

वंजारी सेवा संघ आणि न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्था (महाराष्ट्र राज्य) यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा यंदाचा अत्यंत प्रतिष्ठेचा 'प्रथम राष्ट्रीय संत भगवान बाबा जीवन गौरव पुरस्कार' जाहीर झाला आहे. गुजरात राज्यातील प्रसिद्ध उद्योगपती तथा वंजारी सेवा संघाचे गुजरात प्रदेशाध्यक्ष मा. मोहन रंगनाथ घुगे साहेब यांना या प्रथम जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याची घोषणा आयोजकांकडून करण्यात आली आहे.



मोहन घुगे यांना उद्योग क्षेत्रात मिळवलेले यश आणि त्यांचे सामाजिक योगदान विचारात घेऊन त्यांची या सर्वोच्च पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा येत्या ९ ऑगस्ट २०२६ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत नाशिक येथे संपन्न होणार असून, राज्यमंत्री दर्जा लाभलेले ना. गोविंदराव केंद्र साहेब, आ. मनोज कायदे साहेब, प्रसिद्ध उद्योगपती बुधाजी दादा पानसरे आणि कोंडाजी मामा आव्हाड इत्यादी मान्यवरांच्या शुभहस्ते घुगे साहेबांना हा जीवन गौरव पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार आहे. या मुख्य पुरस्कारासोबतच समाजात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या इतरही मान्यवरांना या सोहळ्यात 'समाजरत्न पुरस्कार' देऊन सन्मानित केले जाणार आहे. मोहन रंगनाथ घुगे साहेब यांना हा बहुमान जाहीर झाल्याबद्दल न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्थेच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षा सौ. यमुनाताई बाळासाहेब घुगे, डॉ. संकेत तुकाराम सानप आणि समस्त आयोजकांनी त्यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन केले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या पुरस्कार घोषणेमुळे घुगे साहेबांवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# हिवताप / डेंग्यू आजारांबाबत जनजागृती

■ नवी मुंबई : प्रतिनिधी

महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये हिवताप / डेंग्यू आजाराचा प्रसार रोखण्यासाठी आरोग्य विभागामार्फत विशेष जनजागृती शिबीरांचे आयोजन करुन नागरिकांमध्ये हिवताप /डेंग्यू आजारांबाबत व डासउत्पत्ती स्थानांबाबत प्रभावीपणे जनजागृती करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून 19 जुलै रोजी नमुंमपा कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशन तसेच वाहतुक नियंत्रण शाखा याठिकाणी विशेष शिबीरांचे आयोजन करुन हिवताप / डेंग्यू विषयक जनजागृती करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकूण 16 पोलीस स्टेशन व वाहतुक नियंत्रण शाखा यामध्ये शिबिरांचे आयोजन करुन एकूण 3809 पोलीस व तेथे भेट देणाऱ्या 400 हून अधिक नागरिकांमध्ये हिवताप / डेंग्यू आजाराविषयक जनजागृती करण्यात आली. तसेच 120 पोलीस व अभ्यागत नागरिकांचे रक्तनमुने घेण्यात आले.सदर शिबिरांचे वैशिष्टय म्हणजे यात ॲनॉफिलीस व एडीस डासांची उत्पत्तीस्थाने प्रत्यक्षात दाखवून,



तसेच नागरिकांना डासांच्या अळ्या प्रत्यक्ष दाखविण्यात आल्या. त्याचप्रमाणे घराभोवती व घरांतर्गत असणारी डासोत्पत्ती स्थाने उदा. पाणी साठवून ठेवलेले ड्रम हे ओढणी, धोतर किंवा साडीच्या कपड्याने बंदिस्त करून ठेवावेत. त्याचप्रमाणे पाणी साठविण्याची भांडी व टाक्या बंदिस्त करणे व आठवड्यातून एक दिवस स्वच्छ व कोरड्या करून ठेवणे, कुठेही पडलेले भंगार साहित्य, टायर्स इत्यादी नष्ट करणे, छतावरील प्लास्टीक शिट, ताडपत्री यामध्ये पाणी साचू देवू नये या सूचनांच्या अनुषंगाने अनेक पोलीसांनी घरात व घराभोवतालच्या परिसरात या ठिकाणी डासोत्पत्ती होते याची माहिती मिळाल्याने समाधान व्यक्त केले व महानगरपालिकेचे आभार मानले. ताप येताच त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेण्याबाबतही पोलीसांना व नागरिकांना प्रोत्साहित करुन जनजागृती करण्यात आली. नमुंमपा आरोग्य विभाग आपल्या परीने जनजागृती व प्रतिबंधात्मक कार्यवाही करीत आहे, त्यासोबतच नवी मुंबईकर नागरिकांनी घरातील व घराभोवतालची डासउत्पत्ती स्थाने नष्ट करणे तसेच आपले घर व परिसर स्वच्छ ठेवणे, आजूबाजूचा परिसर तसेच टेरेसवरील भंगार नष्ट करणे आदी बाबींवर लक्ष दिले तर नवी मुंबईत हिवताप / डेंग्यू आजारावर आळा घालणे शक्य होईल असे आवाहन महापौर सुजाता सुरज पाटील व महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.



# 'SIR' नोंदणीची मुदत २५ ऑगस्टपर्यंत वाढवा; श्री वैद्यनाथ भक्ती मंडळाची निवडणूक विभागाकडे निवेदनाद्वारे मागणी!

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी):

आषाढी वारीनिमित्त पंढरपूर येथे गेलेल्या लाखो भाविकांना 'SIR' नोंदणी करता यावी, यासाठी या नोंदणीची आणि सर्व्हेक्षणाची मुदत २५ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढवून द्यावी, अशी मागणी श्री वैद्यनाथ भक्ती मंडळाच्या वतीने निवडणूक विभागाकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.याबाबत निवडणूक विभागाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या आषाढी वारीनिमित्त महाराष्ट्रातील लाखो भाविक पंढरपूर येथे गेलेले आहेत. पंढरपूर येथील वारी २८ जुलै २०२६ रोजी संपणार असून त्यानंतरच सर्व भाविक आपल्या गावी आणि घरी परतणार आहेत. दुसरीकडे, निवडणूक विभागाच्या 'SIR' नोंदणीची अंतिम मुदत ही २८ जुलै २०२६ अशीच ठेवण्यात आली आहे. वारीचा काळ आणि नोंदणीची शेवटची तारीख एकच आल्यामुळे, वारीत सहभागी झालेले लाखो मतदार या महत्त्वपूर्ण नोंदणी प्रक्रियेपासून वंचित राहण्याची आणि पर्यायाने आपल्या मतदानाच्या हक्कापासून दूर राहण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.या गंभीर बाबीकडे लक्ष वेधत, लोकशाहीत सर्व नागरिकांना आणि भाविकांना नोंदणीची समान संध

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)



# बूथ मजबूत तर यश निश्चित; एसआयआर मोहिमेत शंभर टक्के योगदान द्या

## ना . पंकजाताई मुंडे यांनी घेतला परळी मतदारसंघातील बुथचा आढावा

## बूथ मॅपिंग शंभर टक्के पूर्ण करणाऱ्या बीएलए -२ कार्यकर्त्यांचा केला सत्कार



परळी वैजनाथ |

बूथ हा पक्ष संघटनेचा कणा आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या बूथशी सातत्याने संपर्क ठेवून जनतेच्या समस्या जाणून घ्याव्यात. शंभर टक्के बूथ मॅपिंग पूर्ण करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आदर्श निर्माण केला आहे. आगामी काळात संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आणि जनतेपर्यंत शासनाच्या योजना प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे. कार्यकर्त्यांची मेहनत आणि जनतेचा विश्वास हीच भाजपची खरी ताकद आहे. सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेत सर्वांनी आपापल्या बुथची शंभर टक्के मॅपिंग करावी आणि आपल्या संघटनात्मक कामासह राष्ट्रीय कर्तव्य बजवावे असे आवाहन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केले.

सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर परळी वैजनाथ येथे भाजपाच्या बी एल ए- दोन म्हणून जबाबदारी असलेल्या ३६२ कार्यकर्त्यांची ना.पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात आली, त्यावेळी त्या बोलत होत्या. या बैठकीत एसआयआर मोहिमे अंतर्गत झालेल्या कामाचा, याचबरोबर प्रत्येक बूथ निहाय संघटनात्मक कामांचा आढावा घेण्यात आला. तसेच आगामी नियोजन, बूथ व्यवस्थापन आणि पक्षाच्या विविध उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली. कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवत संघटन मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला.

### उत्कृष्ट कार्यकर्त्यांचा सत्कार

**यावेळी ना पंकजाताई मुंडे यांचा हस्ते 100 % टक्के मॅपिंग पूर्ण केल्याबद्दल दशरथ मुरकुटे, गोविंद कांगणे (मुरकुटवाडी), डॉ. भिमराव माळवे (वालेवाडी), यशवंत फड (पिंपरी), अण्णासाहेब डिघोळे (माळहिवरा), संतोष सोळंके, अशोक मुसळे (नागापुर) यांचा सत्कार करण्यात आला.**

### वाढदिवसाबद्दल साडी चोळी देऊन सत्कार

**दरम्यान, यावेळी ना . पंकजाताई मुंडे यांच्या 26 जुलै रोजी असलेल्या आगामी वाढदिवसानिमित्त परळी मतदार संघाच्या वतीने पंकजाताईंचे अभिष्टचिंतन करण्यात आले. या अनुषंगाने कार्यकर्त्यांनी साडी चोळी देऊन हृदय सत्कार केला.**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बीएलए -१ विधानसभा प्रमुख, बांधकाम सभापती तथा गटनेते प्रा. पवन मुंडे यांनी केले. यावेळी त्यांनी एस आय आर मोहिमेत आत्तापर्यंत झालेल्या कामाचा व आगामी नियोजन याबाबत माहिती आपल्या प्रास्ताविकातून दिली. व्यासपीठावर भाजपाचे पूर्व मंडळ अध्यक्ष राजेश गीते, पश्चिम मंडळ अध्यक्ष वसंत निर्मळ-पाटील, अंबाजोगाई मंडळ अध्यक्ष नाना भगत, परळी शहर मंडळ अध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टी, जेष्ठ नेते दत्ताप्पा इटके, जुगलकिशोर लोहिया, शिवाजीराव गुट्टे, श्रीहरी मुंडे, श्रीराम मुंडे, वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोद सामत, व्हाईस चेअरमन रमेश कराड, संचालक विजयकुमार वाकेकर, संदीप लाहोटी, अनिल तांदळे, महेश्वर निर्मळे, शांतीलाल जैन, निळकंठ चाटे, गणेश कराड, वैजनाथ जगतकर, डॉ. शालिनीताई कराड, सुचिता पोखरकर, शेख अब्दुल करीम, प्रा. बिभीषण फड आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन ज्ञानोबा सुरवसे यांनी केले तर आभार प्रदर्शन रवि कांदे यांनी केले.

# लिबोटा येथील बालाजी राजाभाऊ मुंडे यांचे नीट परीक्षेत घवघवीत यश

## 584 गुणांसह एमबीबीएस शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात मिळणार प्रवेश

## लिबोटा गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा ; बालाजी मुंडे यांच्या नीट यशाने गौरव

परळी वैजनाथ |प्रतिनिधी

राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (NEET-UG 2026) चा निकाल नुकताच जाहीर झाला असून, परळी तालुक्यातील लिबोटा येथील बालाजी राजाभाऊ मुंडे यांनी 584 गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचा मार्ग सुकर झाला असून, परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

लिबोटा येथील राजाभाऊ मुंडे यांचे सुपुत्र बालाजी मुंडे यांनी कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर नीट परीक्षेत हे यश मिळवले. 584 गुण मिळवत त्यांनी वैद्यकीय शिक्षणाचे आपले स्वप्न साकार करण्याच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे. शासकीय वैद्यकीय



महाविद्यालयात प्रवेश मिळण्याची त्यांची शक्यता बळावली आहे.

लहानपणापासूनच अभ्यासू, होतकरू आणि गुणवंत विद्यार्थी म्हणून बालाजी यांची ओळख आहे. आपल्या यशाचे श्रेय त्यांनी आई-वडील, शिक्षक आणि मार्गदर्शकांना दिले. त्यांच्या या यशामुळे लिबोटा गावासह संपूर्ण परळी तालुक्याचा गौरव वाढला आहे.

"बालाजीने घेतलेल्या अथक मेहनतीचे आज चीज झाले आहे. त्याने नीट परीक्षेत मिळवलेले हे यश आमच्या संपूर्ण कुटुंबासाठी अभिमानाचा क्षण आहे. त्याच्या या यशामागे त्याची जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि आईचे मोलाचे योगदान आहे. त्याने पुढे एक संवेदनशील व कर्तव्यदक्ष डॉक्टर बनून समाजाची सेवा करावी, हीच आमची अपेक्षा आहे. बालाजीचे कौतुक करणाऱ्या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो." असे प्रतिक्रिया राजाभाऊ मुंडे (वडील) यांनी दिली.

"नीट परीक्षेत मिळालेल्या या यशामुळे माझे डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार होण्याच्या दिशेने मोठे पाऊल पडले आहे. या यशामागे माझे आई-वडील, शिक्षक आणि मार्गदर्शकांचे मोलाचे मार्गदर्शन तसेच माझ्या सातत्यपूर्ण अभ्यासाची साथ आहे. माझ्यावर विश्वास ठेवून प्रोत्साहन देणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार. पुढे एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण करून एक सक्षम आणि सेवाभावी डॉक्टर म्हणून समाजाची सेवा करण्याचा माझा निर्धार आहे. अशी प्रतिक्रिया बालाजी राजाभाऊ मुंडे यांनी दिली. चि.बालाजी मुंडे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शासकीय कंत्राटदार मधुकर मुंडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. लिबोटा गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.बालाजी मुंडे यांच्या नीट यशाने गौरव प्राप्त केला आहे.

# खळबळजनक! 'मराठवाडा एज्युकेशन'ला टाकणारी टोळी अखेर पोलिसांच्या जाळ्यात

परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

परळी वैजनाथ शहरातील शिक्षण क्षेत्राला काळिमा फासणाऱ्या एका मोठ्या षडयंत्राचा बुरखा अखेर फाटला आहे! अत्यंत प्रतिष्ठित असलेल्या 'मराठवाडा एज्युकेशन एन्ड वेल्फेअर सोसायटी' वर बेकायदेशीरपणे ताबा मिळवण्यासाठी बनावट कागदपत्रांचे जाळे विणणाऱ्या ८ जणांच्या टोळीवर बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात थेट गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कायद्याच्या कचाट्यात सापडलेल्या या संशयितांना आता थेट तुरुंगाची हवा खावी लागणार असल्याने परळी आणि बीड परिसरात एकच प्रचंड खळबळ उडाली आहे.

■ **बनावट सह्या आणि खोट्या शपथपत्रांचा सुळसुळाट!**

मिळालेल्या माहितीनुसार, संस्थेचा कार्यकाळ संपताच या टोळीने डोळे वटारून संस्था बळकावण्याचा कट रचला. कोणतीही अधिकृत सभा न घेता, केवळ घरात बसून बनावट कागदपत्रे, खोटे ठराव आणि खोट्या सह्या करून धर्मादाय उपायुक्त कार्यालय, बीड यांची दिशाभूल करण्याचा भयंकर प्रकार या आरोपींनी केला. एवढेच नाही, तर वकिलांनाही खोटे दस्तऐवज सादर करून त्यांची फसवणूक करण्यात आली. मात्र, न्यायाच्या दरबारात खोटेपणा जास्त काळ टिकला नाही; माननीय धर्मादाय उपायुक्तांनी तात्काळ या बनावट बदल अहवालास स्थगिती देऊन आरोपींच्या तोंडाला चपराक दिली आहे.

अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे, केवळ कागदोपत्रीच नाही, तर प्रत्यक्षात शाळेमध्ये बेकायदेशीरपणे घुसून धिंगाणा घातला अशीही माहिती ऐकायल मिळत आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना धमकावून, दहशत निर्माण करत त्यांनी 'फारोखी उर्दू प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या' कामात मोठा अडथळा निर्माण केला आहे. शिक्षण मंदिराचे पावित्र्य भंग करणाऱ्या या समाजकंटकांमुळे निष्पाप विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत असून पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

■ **'हीच ती' ८ नावे-**

गुन्हेगारी आणि लबाडीचा मार्ग पत्करून संस्थेला गिळंकृत करू पाहणारे संशयित आरोपी आता पोलिसांच्या रडारवर आले आहेत. गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे खालीलप्रमाणे:

१. महंमद सिराजोद्दीन महंमद गौस (रा. परळी वैजनाथ), २. पठाण सुलतान खान गाजीयोद्दीन (रा. शिरसाळा, ता. परळी) - ज्यावर आधीच अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याचे समजते! ३. सय्यद आसेफ सय्यद अली (रा. परळी वैजनाथ) ४. जियाऊर रहेमान मीनहाजोद्दीन मुलानी (रा. परळी वैजनाथ) ५. शेख पाशा मोहम्मद साब (रा. परळी वैजनाथ) ६. शेख जुबेर शेख शब्बीर (रा. परळी वैजनाथ) ७. अब्दुल बशीर मुनिरोद्दीन (रा. परळी वैजनाथ) ८. सय्यद सादतअली सय्यद रियासतअली (रा. परळी वैजनाथ)

संस्थेचे प्रामाणिक पदाधिकारी अब्दुल जफर अब्दुल सत्तार पटेल यांच्या खंबीर तक्रारीनंतर पोलिसांनी या टोळीवर कायद्याचा बडगा उगारला आहे. शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा रजि. क्र. 0201/2026 अन्वये भारतीय न्याय संहितेच्या (BNS) अशा कडक कलमांनुसार गुन्हे दाखल केले आहेत.

कलम ३१६: विश्वासघात करणे,कलम ३१८(४): फसवणूक करून मालमत्ता हडपण्याचा प्रयत्न

कलम ३३६(३) व ३३८: बनावट कागदपत्रे तयार करून ती खरी भासवणे,कलम ३४०(२): खोट्या शपथा घेऊन शासकीय संस्थांची फसवणूक करणे कलम ३(५): टोळी बनवून कट रचणे (संगनमत)

सदर गंभीर प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक शितलकुमार रामनाथ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) दीपक दत्तात्रय लंके यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.

## लोकरंग

# साप्ताहिक संवाद : पारदर्शी शिक्षणव्यवस्थेसाठी कॉक्रोच पक्षाचे आंदोलन

मागील काही आठवड्यापासून शिक्षणव्यवस्थेत सुरु असलेल्या अनागोंदी कारभारामुळे देशभरातील शिक्षण व्यवस्थेचे वाभाडे निघत आहेत. सुरवातीला वैद्यकीय प्रवेशासाठी असलेल्या नीट परीक्षेची पेपरफुटी आणि त्यापाठोपाठ राज्यामध्ये झालेल्या टीईटी पेपरफुटी नंतर देशभरातील विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात ढकलेले गेले आहे. तरुणांमध्ये प्रचंड अस्वस्थता दिसतेय. अर्थात शिक्षण क्षेत्रातील या भ्रष्टाचाराची आणि अनैतिक कारभाराची नैतिक जवाबदारी स्वीकारून केंद्रीय आणि राज्यातील शिक्षण मंत्र्यांनी आपला राजीनामा द्यावा या मागणीसाठी जगप्रसिद्ध शाश्त्रज्ञ आणि पर्यावरणवादी अभ्यासक सोनम वांगचुक दिल्लीमध्ये उपोषणास बसलेले आहेत. सरकार मात्र त्यांच्या उपोषणाकडे पद्धतशीरपणे डोळेझाक करतेय. याच पार्श्वभूमीवर वांगचुक यांच्या सरकारविरोधी कारभाराला पाठिंबा दर्शविण्यासाठी मुंबईत आणि महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये कॉक्रोच पक्षाच्या वतीने आंदोलन सुरु केले गेले




आहे.याच अनुषन्गाने कॉक्रोच पक्षाचे संघटक प्रणव अहिरे यांच्याशी साप्ताहिक संवाद.

■ **१]कॉक्रोच पक्षाच्या वतीने राज्यस्तरावर केल्या जाणाऱ्या आंदोलनाचा उद्देश काय आहे?**

देशातील शिक्षण व्यवस्था सध्या अत्यंत भ्रष्टाचाराने बरबटलेली आहे. नीट आणि टीईटी परीक्षांच्या पेपर फुटीचे प्रकरण हे या भ्रष्ट शिक्षणव्यवस्थेचे उत्तम उदाहरण आहे. यामुळेच देशभरातील विद्यार्थी,पालक,आणि स्पर्धा परीक्षा देणाऱ्या लाखो युवकांमध्ये परीक्षा व्यवस्थेबाबत गंभीर अस्वस्थता निर्माण झाली आहे. विद्विह परीक्षांमधील गैरप्रकारामुळे शिक्षण व्यवस्थेतील विश्वासाला धक्का बसला आहे. याच पार्श्वभूमीवर पारदर्शी शिक्षणव्यवस्था,उत्तरदायित्व आणि निष्पक्षता या मागणीसाठी हे आंदोलन सुरु केले आहे.

■ **२]कॉक्रोच पक्षाच्या सरकारकडे काय मागण्या आहेत?**

देशभरातील शिक्षण क्षेत्रात झालेल्या गैरप्रकाराची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान आणि राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी राजीनामा द्यावा,कथित पेपरफुटीची निष्पक्ष चौकशी व्हावी,दोषींवर कठोर कारवाई,या परीक्षा पारदर्शी बनवण्यासाठी सुधारणा,विद्यार्थयांना भ्रष्टाचार मुक्त पारदर्शी शिक्षणवयवस्था उपलब्ध व्हावी आदी मागण्या आहेत.

■ **३]आपल्या या आंदोलनाची पुढील दिशा काय असणार आहे?**

आम्ही आजचे तरुण हे छत्रपती शिवाजी महाराज,फुले शाहू आंबेडकरांचा वारसा सांगणारे आणि त्यामुळेच संविधानिक पद्धतीने न्याय मागण्यासाठी हे आंदोलन करीत आहोत. आमचे हे आंदोलन शांततेच्या मार्गानेच होणार आहे. त्यासाठी आम्ही पोलिसांची रीतसर परवानगी देखील घेतलेली आहे. विविध सामाजिक संघटनाने,पक्षांनी आणि जनतेने देखील आपली जबाबदारी म्हणून आपला या आंदोलनाला आणि विद्यर्थ्यांच्या भवितव्यासाठी पाठिंबा द्यावा अशी आमची प्रांजळ अपेक्षा आहे.

■ **दखल : भारतीय उद्योगांच्या भावी पिढ्यांसाठी 'टॅली सोल्युशन्स'चा स्टार्टअप कार्यक्रम नागपुरात**

भारतातील आघाडीची बिझनेस ऑटोमेशन सॉफ्टवेअर पुरवठादार कंपनी 'टॅली सोल्युशन्स'ने ५ जुलै २०२६ रोजी आपला देशव्यापी स्टार्टअप उपक्रम 'टॅली स्टार्टअप कलेक्टिव्ह' नागपुरात आणला. देशभरातील या कार्यक्रमाच्या प्रवासातील हा १५ वा टप्पा (चॅप्टर) ठरला आहे. या उपक्रमाला 'सांचीकनेक्ट' या इकोसिस्टम भागीदाराचे सहकार्य लाभले आहे.

नागपूरमधील हा कार्यक्रम 'व्हीएनआयटी' नागपूरच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता आणि याच वेळी 'व्हेंचर्स वॉल्ट फाउंडेशन' चे उद्घाटनही पार पडले. या दोन उपक्रमांनी एकत्रितपणे या क्षेत्रासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला.

**- संकलन –संयोजन : सुबोध रणशेवरे**

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

• बीड, शनिवार, 18 जुलै 2026




# शिक्षणासाठी चिमुकल्यांनी थेट उपशिक्षणाधिकारी यांना घेरलं!

## तर.....शिक्षणाधिकाऱ्यांकडून आंदोलनाची 'नाटक' म्हणून हेटाळणी? परळीच्या वैद्यनाथ विद्यालयात संतापजनक प्रकार!

## उपशिक्षणाधिकारी शिंदेंची भेट घेत विद्यार्थिनींनी मांडली व्यथा








**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

"शिक्षण आमच्या हक्काचं, नाही कोणाच्या बापाचं" अशा जोरदार घोषणा देत परळीतील नामांकित वैद्यनाथ विद्यालयातील विद्यार्थ्यांनी थेट तीव्र आंदोलन छेडले आहे. मागील काही महिन्यांपासून विस्कळीत झालेली शिक्षण व्यवस्था, शिक्षकांची मनमानी आणि त्यातच बीडच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या या आंदोलनाला कथितरीत्या "नाटक" संबोधल्याची ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्याने परळीसह संपूर्ण बीड जिल्ह्यात संतापाची तीव्र लाट उसळली आहे.

■ **का निर्माण झाला विद्यार्थ्यांचा रोष?**

वैद्यनाथ विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या दहावी व इतर वर्गांतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप करत विद्यार्थ्यांनी आंदोलनाचे हत्यार उपसले. शाळेत एकूण १६ शिक्षकांची मंजुरी असताना प्रत्यक्षात केवळ ६ शिक्षक उपस्थित राहतात. उर्वरित १० शिक्षक शाळेत फिरकतच नसल्याचा खळबळजनक आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे.

जे जुने व अनुभवी शिक्षक नियमित तासिका घेत होते आणि ज्यांचे शिकवणे विद्यार्थ्यांना समजत होते, त्यांची इतरत्र बदली करण्यात आली आहे.

नवीन आलेल्या शिक्षकांचे शिकवणे विद्यार्थ्यांना समजत नाही, त्यांना सेमी इंग्रजीचे विषय शिकवता येत नाहीत, तसेच ते नियमित वर्ग न घेता वर्गात मोबाईल वापरतात.

■ **वर्ग नियमित होत नसल्यामुळे दहावीसारख्या महत्त्वपूर्ण वर्षाचा अभ्यासक्र मागे पडला**

या सर्व गंभीर प्रकाराला कंटाळून अखेर चिमुकल्या विद्यार्थ्यांनी ठिय्या मांडत शिक्षण विभागाविरोधात तीव्र घोषणाबाजी केली.

उपशिक्षणाधिकारी तसेच प्रभावी मुख्याध्यापक धनंजय शिंदे यांनी विद्यालयाला भेट दिली. यावेळी त्यांच्यासमोर विद्यार्थ्यांनी आपली आपबीती मांडली. "आम्हाला नवीन शिक्षकांचे काहीच समजत नाही, आमचा अभ्यासक्रम मागे पडलाय, वर्गात मोबाईल चालतात, आम्हाला आमचे जुने शिक्षक परत द्या," अशी थेट आणि स्पष्ट बाजू विद्यार्थिनींनी अधिकाऱ्यांसमोर मांडली.

यावर पत्रकारांशी बोलताना उपशिक्षणाधिकारी तसेच प्रभावी मुख्याध्यापक धनंजय शिंदे म्हणाले, "आम्ही या प्रकरणाची तात्काळ माहिती घेत आहोत. विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होणार नाही आणि अभ्यासक्रम मागे पडणार नाही अशा प्रकारे तात्काळ नियोजन केले जाईल. या संपूर्ण प्रकरणाची माहिती मी वरिष्ठांना देणार आहे."

■ **"उपोषण कशाचे... सगळी नाटकं चालू आहेत!"**

शिक्षणाधिकाऱ्यांच्या कथित वक्तव्याने खळबळ. या प्रकरणाला खरा राजकीय आणि सामाजिक वळण मिळाले ते एका व्हायरल ऑडिओ क्लिपमुळे!

सलग तीन दिवस चिमुकले विद्यार्थी आपल्या हक्काच्या शिक्षणासाठी आंदोलन करत असताना, परळीतील एका नगरसेवकाने बीडच्या शिक्षणाधिकाऱ्यांना फोन करून या प्रकरणात लक्ष घालण्याची विनंती केली. मात्र, या गंभीर प्रश्नावर संवेदनशीलता दाखवण्याऐवजी, शिक्षणाधिकाऱ्यांनी थेट "उपोषण कशाचे... सगळी नाटकं चालू आहेत!" आणि "इतके दिवस हे विद्यार्थी झोपले होते का?" अशी अत्यंत अशोभनीय व बेजबाबदार विधाने केल्याचा आरोप होत आहे.

■ **ही कथित कॉल रेकॉर्डिंग सोशल मीडियावर वाऱ्यासारखी व्हायरल झाली आहे.**

या कथित वक्तव्याबाबत जेव्हा उपशिक्षणाधिकारी तसेच प्रभावी मुख्याध्यापक धनंजय शिंदे शिंदेंना पत्रकारांनी याबाबत विचारले, तेव्हा त्यांनी आपल्या वरिष्ठांची पाठराखण करण्याचा प्रयत्न केला. "आमच्या मॅडम अत्यंत सुसंस्कृत आहेत, त्या असे विधान करणार नाहीत याची मला खात्री आहे. तरीही या व्हायरल क्लिपबाबत मी नक्की माहिती घेईन," असा सावध पवित्रा शिंदेंनी घेतला.

### पालक, शिक्षणप्रेमी आणि नागरिकांमध्ये तीव्र संताप

**शासकीय स्तरावर शिक्षणाच्या गुणवत्तेचे मोठेमोठे दावे केले जात असताना, दुसरीकडे स्वतःच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वेदनांची अशी थट्टा केली जात असल्यामुळे पालक आणि नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.**

**"ज्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याची जबाबदारी शिक्षण विभागावर आहे, त्यांनाच शिक्षणासाठी रस्त्यावर उतरावे लागणे हे यंत्रणेचे अपयश नाही का? आणि जर विद्यार्थ्यांचे हे आंदोलन 'नाटक' असेल, तर त्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या बेजबाबदार अधिकाऱ्यांना काय म्हणायचे?"**

**जरी या व्हायरल ऑडिओ क्लिपची अधिकृत सत्यता अद्याप सिद्ध झालेली नसली, तरी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करावी आणि वैद्यनाथ विद्यालयात तातडीने नियमित शिक्षक नियुक्त करावेत, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.**

# आ. सुरेश आण्णा धस यांच्यावरील आरोपांवर समर्थक भाऊसाहेब झांजे आक्रमक

## राम खाडे यांनी आपली मर्यादा ओळखावी

**प्रतिनिधी - सोपान पगारे**

आ. सुरेश आण्णा धस यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांमुळे तालुक्यातील राजकीय वातावरण तापले आहे. या आरोपांच्या पार्श्वभूमीवर आ. धस यांच्या समर्थकांनी आक्रमक भूमिका घेतली असून, यासंदर्भातील काही व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.

व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये समर्थकांनी आ. सुरेश धस यांच्यावरील सर्व आरोप बिनबुडाचे, निराधार आणि केवळ राजकीय प्रसिद्धीसाठी केले असल्याचा दावा केला आहे.

"आ. धस हे सर्वसामान्यांचे आधारवड व दीन-दुबळ्यांचे कैवारी आहेत. त्यांनी आजवर नेहमीच जनतेच्या प्रश्नांसाठी संघर्ष केला आहे. अशा लोकनेत्यावर खोटे आरोप करून त्यांची प्रतिमा मलीन करण्याचा कोणताही प्रयत्न यशस्वी होणार नाही" असे समर्थकांनी व्हिडिओच्या माध्यमातून सांगितले.

■ **जयंत पाटलांवर टीका**

या व्हिडिओमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयंत पाटील यांच्यावरही टीका करण्यात आली आहे. "दुसऱ्यांवर आरोप करण्यापूर्वी स्वतःच्या भूतकाळाचे आत्मपरीक्षण करावे. जनतेच्या प्रश्नांवर बोला" असा इशारा देत "स्वतःचे ठेवायचे झाकून आणि दुसऱ्याचे पाहायचे वाकून" अशा शब्दांत टीका करण्यात आली.



■ **भाऊसाहेब झांजे आक्रमक**

याच पार्श्वभूमीवर भाऊसाहेब झांजे यांनी रामखाडे यांच्यावर निशाणा साधला आहे.

"जशास तसे उत्तर देऊ. विनाकारण बदनामी करू नका" असे भाऊसाहेब झांजे यांनी स्पष्टपणे सांगितले.

सध्या या प्रकरणामुळे आष्टी परिसरात चर्चेला उधाण आले आहे. समर्थक सोशल मीडिया आणि गावपातळीवर आ. धस यांच्या समर्थनार्थ उतरले आहेत.

# प्रशासकांच्या कार्यकाळात नियमबाह्य पद्धतीने करण्यात आलेली अंशकालीन स्त्री परिचर पदाची भरती रद्द करून चौकशी करा



**महागाव | प्रतिनिधी**

महागाव तालुक्यातील हिवरा (सं) ग्रामपंचायतीमध्ये अंशकालीन स्त्री परिचर पदासाठी भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती. सदर पदासाठी एकूण पाच अर्ज प्राप्त झाले होते.

मात्र, प्राप्त अर्जापैकी शैक्षणिक पात्रता, अनुभव, गुणवता व शासनाने विहित केलेले निकष विचारात न घेता प्रशासक व ग्रामपंचायत अधिकारी यांनी मनमानी व नियमबाह्य पद्धतीने उमेदवाराची निवड केली आहे. त्यामुळे अधिक पात्र व अनुभवी उमेदवारांवर अन्याय झाला असून भरती प्रक्रियेतील पारदर्शकता व समान संधीच्या तत्त्वाचे उल्लंघन झाले असल्याचा आरोप मा. उपसरपंच शरद कदम यांनी जिल्हा वैद्यकीय अधिकारी यांना पत्रातून केला.

याशिवाय, ग्रामपंचायतीवर प्रशासक कार्यरत असताना केवळ दैनंदिन व अत्यावश्यक प्रशासकीय कामकाज करणे अपेक्षित असते. अशा कार्यकाळात दीर्घकालीन परिणाम करणारे किंवा धोरणात्मक स्वरुपाचे निर्णय घेणे उचित नसतानाही सदर भरती प्रक्रिया राबवून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे या भरतीच्या वैधतेबाबत गंभीर शंका निर्माण झाली असल्याने आपण या संपूर्ण भरती प्रक्रियेची निष्पक्ष चौकशी करून संबंधित सर्व कागदपत्रांची तपासणी करावी. चौकशीत नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास अंशकालीन स्त्री परिचर पदाची भरती तात्काळ रद्द करण्यात यावी. तसेच शासनाच्या विद्यमान नियमांनुसार, पात्रता, गुणवत्ता व अनुभवाच्या आधारे नव्याने पारदर्शक भरती प्रक्रिया राबविण्यात यावी. यास जबाबदार असलेल्या संबंधित अधिकारी व व्यक्तींवर नियमानुसार योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी जिल्हा वैद्यकीय अधिकारी यांना पत्रातून मागणी शरद देविदास कदम (मा.उपसरपंच ग्रा.पं. हिवरा (सं), राजू किसनराव धोतरकर (मा. ग्रा.पं. सदस्य हिवरा (सं) यांनी केली आहे.

# आ. धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवाजीनगरमध्ये आज भव्य मोफत आरोग्य शिबिर

## नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा-भीमराव डावरे, निळकंठ चाटे व लक्ष्मण मुरकुटे



**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-**

आमदार धनंजयजी मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवार, दि. 18 जुलै 2026 रोजी शिवाजीनगर, परळी वैजनाथ येथे भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे आयोजन श्री. भीमराव डावरे, श्री. निळकंठ चाटे आणि श्री. लक्ष्मण मुरकुटे यांनी केले आहे.

आरोग्य शिबिरात शिवाजीनगर व परिसरातील नागरिकांसाठी सीबीसी (CBC), हिमोग्लोबिन (HB), रक्तातील साखर (Sugar) तसेच गुप्त आजारांची तपासणी मोफत करण्यात येणार आहे. तसेच परळी उपजिल्हा रुग्णालयातील कौन्सेलर व लॅब टेक्निशियन उपस्थित राहून नागरिकांची तपासणी व आवश्यक मार्गदर्शन करणार आहेत.

हे शिबिर शिवछत्रपती विद्यालय, हनुमान मंदिराच्या बाजूला, शिवाजीनगर, परळी वैजनाथ येथे सकाळी 10.00 ते दुपारी 1.00 या वेळेत आयोजित करण्यात आले आहे. आयोजकांनी शिवाजीनगर व परिसरातील सर्व नागरिकांनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घेऊन आपल्या आरोग्याची तपासणी करून घ्यावी, असे आवाहन केले आहे.





